## एमजीएनएफमध्ये 9 संस्थांचा समावेश

# संकल्प प्रोजेक्टसाठी झाली आयआयएम नागपूरची निवड

व्यापार प्रतिनिधी




**नागपूर.** जिल्हा कौशल्य प्रशासन व जिल्हा कौशल्य समित्या (डीएससी) सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्यमशिलता मंत्रालय (एमएसडीआय)ने महात्मा गांधी राष्ट्रीय फेलोशिप (एमजीएनएफ) कार्यक्रमाची घोषणा केली आहे. देशातील 9 आयआयएम संस्थांचा यात समावेश करण्यात आला आहे. यात नागपूर आयआयएमचासुद्धा समावेश आहे. संकल्पअंतर्गत एक कार्यक्रम आहे. तो जिल्हा कौशल्य प्रशासन व जिल्हा कौशल्य समित्या (डीएससी)ला आणखी सक्षम करेल. एमजीएनएफअंतर्गत फेलोजला डीएससीसोबत संलग्न करण्यासह संपूर्ण स्किल इकोसिस्टम समजण्यात अकादमिक विशेषज्ज्ञता आणि तांत्रिक दक्षता प्राप्त होईल आणि जिल्हा कौशल्य विकास योजनांची निर्मिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जिल्हा स्तरावर कौशल्य विकास योजनांचे व्यवस्थापन करण्यात मदत मिळेल. मंत्रालयातर्फे आता एमजीएनएफचा विस्तार देशातील सर्व उर्वरित जिल्ह्यांमध्ये करण्यात येत आहे. एमजीएनएफमध्ये अकादमिक उत्कृष्टता आणि प्रतिष्ठेचा दर्जा कायम राखण्यासाठी मंत्रालय केवळ आयआयएमसोबतच अकादमिक भागीदारी करीत आहे. 9 आयआयएममध्ये आयआयएम बंगळुरू, अहमदाबाद, लखनौ, कोझिकोड, विशाखापट्टनम, उदयपूर, नागपूर, रांची व जम्मूचा समावेश आहे.